**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JULY-AUGUST, 2022, VOL- 10/72*
*https://doi.org/10.21922/srjis.v10i72.11631*

# विधार्थी बोधनिक क्षमता अभ्यास

**प्रा. प्रकाश जगताप, Ph .D.**
टिळक शिक्षण महाविधालय, पुणे

**Paper Received On:** 25 AUGUST 2022
**Peer Reviewed On:** 31 AUGUST 2022
**Published On:** 01 SEPTEMBER 2022

***Abstract***

*विधार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा एक मोठा उउदेश आपल्या शिक्षण पद्धतीचा आहे. विधार्थ्यांची बोधनिक क्षमता हि अध्ययन –अध्यापन प्रकीर्येत महत्वपूर्ण आहे. या बोधनिक क्षमतेचा योग्य विकास होणे आवश्यक आहे.या बाबी आनुवंश व वातावरण या घटकावर हि बऱ्याच प्रमाणावर अवलंबून असतात.प्रस्तुत संशोधनपर लेखात विधार्थ्यांच्या बोधनिक क्षमतेचा सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून शोध घेतला त्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

बोधन याचा अर्थ आकलन असा होतो. बोधन याचा व्यक्तीच्या मानसिक प्रकीर्यशी संबंध असतो. बोधनिक क्षमतेत व्यक्तीच्या उच्च मानसिक क्षमता यात बुद्धी ,आकलन क्षमता, तर्क ,समस्या निराकरण, जागरूकता , स्मरण या बाबीचा समावेश होतो. विद्यार्थी बोधनिक क्षमता विकसनासाठी आवश्यक आहे.१. शाब्दिक क्षमता, २. संख्यात्मक क्षमता, ३. अमूर्त तर्क क्षमता, ४.शाब्दिक तर्क क्षमता अशा चार क्षेत्राची क्षमता निश्चिती केली आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धीच्या क्षमता राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा संगीत परीक्षा गणित ऑलिपियाड, बोधनिक क्षमता विकसन, बदलेल्या संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यामध्ये अनेक अडचणी शिक्षकांना येतात.आपल्या भारतीय संस्कृतीत शिक्षकाला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. शिक्षकांचा आदर करणे, मानसन्मान देणे, अशी आपली ही परंपरा प्राचीन काळापासून आजपर्यंत चालत आलेली आहे.

दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आणि शिक्षणाची गुणवत्ता अविरतपणे उंचावण्यासाठी विद्यालयामधील शिक्षक इतर मानवी घटक आणि भौतिक सुविधा अतिशय महत्वपूर्ण ठरतात. यापैकी विद्यार्थी गुणवत्ता हा खूप महत्त्वाचा विषय आहे.अध्ययन अध्यापन प्रकिर्येत विधार्थी बोध्दिक क्षमता महत्वपूर्ण ठरतात.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाची गरज**

शालेय विद्यार्थ्यांच्या बोधानिक क्षमतेचा स्तर जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेतील एक महत्वाचा घटक असून शिक्षकाने आपल्या पेशाशी बांधिलकी जपली पाहिजे. तसेच मुलांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यासाठी बदलेल्या अभ्यासक्रमांनुसार पाठ्यपुस्तकातील विषयाचे अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी, त्यावर उपाय योजना या दृष्टीने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे. शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील विद्वान घटक आहे. समाज व शिक्षण एकाच नाण्याचे दोन बाजू आहेत. विध्यार्थ्याच्या बोधनिक विकासाचे मापन करण्यासाठी विद्यार्थी बोधनिक मंचाची आवशकता होती. विद्यार्थ्यांसाठी बोधनिक कार्यक्रम व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास केल्याने विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना मार्गदर्शन करून योग्य दिशेने वाटचान उच्च प्राथमिक स्तरावरील बोधनिक क्षमता विकसनाबाबत शिक्षकांमध्ये पुरेशी जाणीव जागृती नाही. शालेय दर्जा टिकवून राहण्यासाठी शालेय गुणवत्ता कायम राहणे आवश्यक आहे. पण ती तशीच टिकून राहत नाही. यांच्या पाठीमागे अनेक कारणे आहेत. विद्याथ्यांची शाळेतीन कमी प्रगती असणे हि गंभीर समस्या होऊन बसलेली आहे. त्यामुळे शिक्षकांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले आहे.

**समस्या विधान**

उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बोधनिक क्षमताचा अभ्यास करणे.

- **कार्यात्मक व्याख्य**

१. उच्च प्राथमिक स्तर - सदर संशोधनात प्राथमिक स्तरावरीन इयत्ता सहावी ते आठवी या वर्गाचा विचार केला आहे. या वर्गातील मुलांचे वय १२ ते १४ वर्ष इतके असते.

२. विद्यार्थी-उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता सहावी ते आठवी इयत्तेत शिकणारे विद्यार्थी.

३. विद्यार्थी बोधानिक क्षमता - विद्यार्थी बोधनिक क्षमतेत आकलन क्षमता, तर्क क्षमता, निर्णयक्षमता, विचारक्षमता, समस्या निराकरण या बाबींचा समावेश होतो.

**४. संशोधनाची उदिष्टे**

संशोधकाने प्रस्तुत मंशोधनात संशोधनाची उदिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

१. उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्याच्या बोधनिक क्षमतेचा शोध घेणे .

**२.उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्याच्या बोधनिक क्षमतेची खालील घटकाप्रमाणे तुलना करणे अ.पुरुष विधार्थी व स्त्री विद्यार्थी ब.ग्रामीण भागातील विधार्थी व शहरी भागातील विधार्थी .**

**१.८. संशोधनाची गृहितके**

संशोधकाने प्रस्तुत संशोधनात संशोधनाची पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१. बोधनिक क्षमतेमुळे विद्याभ्यांच्या विचार कौशल्याचा विकास होतो (सुरेश करंदीकर) .

२. बोधनिक क्षमतेचा विकास सभोवतालच्या परिस्थीतून होत असतो. (अ. पा .खरात)

- **शून्य परिकल्पना**

विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या बोधनिक क्षमता प्राप्तांकामध्ये सार्थ फरक आढळत नाही.

१. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्याच्या बोधनिक क्षमता प्राप्तांकाच्या मध्यमानामध्येकोणताही सार्थ फरक आढळत नाही.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने विद्यार्थी बोधानिक क्षमता विकसनाबाबतच्या सद्यस्थितीचा स्तर जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत संशोधनात उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बोधनिक क्षमतेसंबंधी विद्यार्थ्यांची संख्यात्मक क्षमता, अमूर्त तर्क क्षमता, शाब्दिक तर्क क्षमता या बोधनिक क्षमतेच्या शोध घेऊन ग्रामीण व शहरी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला.

| अ. क्र. | नमुना | संख्या | मध्यमान | विद्यार्थी बोधनिक क्षमतेचा स्तर |
|---|---|---|---|---|
| **१.** | विद्यार्थी | ५१ | ४२ .२९ | समाधानकारक |
| **२.** | विदयार्थीनी | ४० | ४४ .३७ | समाधानकारक |
| **३.** | ग्रामीण | ६२ | ४४ .५५ | समाधानकारक |
| **४.** | शहरी | २९ | ४१ .३४ | समाधानकारक |

• कोष्टक नुसार विद्यार्थ्यांचा बोधनिक क्षमता विकासाचा स्तर समाधानकारक असून लिंगभाव, अध्ययन अनुभव, शाळेचे स्थान, यानुसारही विद्यार्थी बोधनिक स्तर समाधानकारक आहे.

शून्य परिकल्पना -विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या बोधनिक क्षमता प्रश्नावली च्या प्राप्तांकाच्या मध्ययांनामध्ये सार्थ फरक आढळत नाही.

सदर शून्य परिकल्पना तपासण्यासाठी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना बोधनिक क्षमता प्रश्नावली मध्ये मिळालेल्या प्राप्तांकांच मध्यमान प्रमाण विचलन काढण्यात आले. तसेच टी परीच्या परीक्षिका च्या मदतीने दोन्ही मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यात आली.

| नमुना | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | | शून्यपरिकल्पना स्वीकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | ५१ | ४२ .२९ | ५ .१४ | ०.२९ | स्वीकार |
| विद्यार्थिनी | ४० | ४४ .३७ | ६ .२७ | | |

कोष्टकातील टी मूल्य -०.०५ सार्थकता स्तर स्वाधीनता मात्रा ९० कोष्टक वरून असे दिसून येते की, विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना बोधानिक क्षमता शलाकेमध्ये मिळालेल्या प्राप्तांकाची तुलना केली असता येणारे ०.२९ .मूल्य इतके आहे. ०.०५ या सार्थकता स्तरावर कोष्टक टी १.९८ मुल्ये इतके आहे. गणन केलेले टी मूल्य हे कोष्टक टी मूल्यापेक्षा कमी असल्याने शून्य परिकल्पना चा स्वीकार करण्यात आला. म्हणजेच विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या बोधनिक क्षमतेमध्ये सार्थ फरक नाही. यावरुन विद्यार्थी व विद्यार्थिनी बोधनिक क्षमता सारखीच आहे.

शून्य परिकल्पना - ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या बोधानिक क्षमता शलाका प्राप्तांकाच्या मध्यमानामध्ये कोणताही सार्थ आढळत नाही.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सदर शून्य परिकल्पना तपासण्यासाठी ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना बोधनिक क्षमता शलाकेमध्ये मिळालेल्या प्राप्तांकांचे मध्यमान, प्रमाण विचलन काढण्यात आले. तसेच टी परीक्षिकेच्या दोन्ही मध्यमानातील फरकांची साधकता तपासण्यात आली.

ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या बोधनिक क्षमता, मध्यमान, प्रमाण विचलन आणि टी मूल्य

| नमुना | नमुना संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मूल्य | शून्य परिकल्पना स्वीकार |
|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ६२ | ४४ .५५ | ५.४० | ०.३९ | |
| शहरी | २९ | ४१ .३४ | ५.४२ | | |

- **कोष्टकातील टी.मूल्य ० :०५ सार्थकता स्वाधीनता मात्रा :९०**

कोष्टक वरून असे दिसून येते की, ग्रामीण व शहरी भागातील विधार्थी यांना बोधनिक क्षमता शलाकेमध्ये मिळालेल्या प्राप्तांकाची तुलना केली असता येणारे टी मूल्य ०.३९ इतके आहे. ०.०५ या सार्थकता स्तरावर कोष्टक टी १.९८ मुल्ये इतके आहे. गणन केलेले टी मूल्य हे कोष्टक टी मूल्यापेक्षा कमी असल्याने शून्य परिकल्पना चा स्वीकार करण्यात आला. म्हणजेच ग्रामीण व शहरी विद्यार्थी यांच्या बोधनिक क्षमतेमध्ये सार्थ फरक नाही. यावरून ग्रामीण व शहरी विद्यार्थी यांची बोधानिक क्षमता सारखीच आहे.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनामध्ये मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि अर्थनिर्वचनकरून संशोधकाने पुढीलनिष्कर्ष काढले आहेत.

१. विद्यार्थ्यांचा बोधनिक क्षमता स्तर समाधानकारक आहे.

२. विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचा बोधनिक क्षमता स्तर समाधानकारक असून तो सार्थक आहे.

३. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा बोधनिक क्षमता स्तर समाधानकारक असून तो सार्थक आहे.

**संदर्भग्रंथ**

*दांडेकर वा (२०१०) शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र, पुणे, श्रीविदया प्रकाशन*

*दांडेकर वा. ना., शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्र, नरेंद्र प्रकाशन, पुणे*

*घोरमोडे के यु घोरमोडे क (२००९) शिक्षकांचे शिक्षण, नागपूर, विदया प्रकाशन १० जगताप ह. (२००६) अध्ययन उपपत्ती व अध्ययन पुणे, नित्यनूतन प्रकाशन,*

*आगलावे प्र (२०००) संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, पुणे, विदया प्रकाशन*

*भिताडे वि (२००७) शैक्षणिक संशोधन पध्दती पुणे, नित्यनूतन प्रकाशन*

*भोसले अ डोणे उ. (२००९) शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, कोल्हापूर, फडकेपब्लिकेशन्स*

*भोसले से इंगळे स इनामदार इ. सकपाळ प. (२००६) शिक्षक गुणवत्ता संवर्धन, कोल्हापूर, फडके प्रकाशन*

*बोधनकर सु अलोणी वि. (१९९९) सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन*